पालकमंत्र्यांच्या हस्ते ग्रामपंचायत निवडणुकीत चांगले मताधिक्य कमावलेले व निवडून आलेले ग्रामपंचायत सदस्य यांचा जंगी सत्कार राजपुरी येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष्य ॲड. महेश मोहिते, तालुका अध्यक्ष जयवंत अंबाजी, शहर अध्यक्ष प्रवीण बैकर, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष महेंद्र चौलकर, नरहरी गीदि ,अलका मोंनाक यांसह अनेक पदाधिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री चव्हाण आपल्या भाषणात म्हणाले की, रायगड जिल्ह्यात अनेक वर्ष शेकापने सत्ता उपभोगली परंतु आश्वासनांची पूर्तता न करता आल्याने आज प्रत्येक गावातील व्यक्ती भारतीय जनता पार्टी कडे आकर्षित होत आहे. लोकांचा विश्वास आम्ही सार्थ ठरवणारच या भागात लोकांच्या समस्या सोडवून जन्मात प्राप्त करण्यात भारतीय जनता पार्टी मागे पडणार नाही असा विश्वास यावेळी त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला.

दरम्यान राजपुरी कोळीवाड्यात जो पूर्वापार शेतकरी कामगार पक्षासोबत राहिला आहे. तिथे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांचे जोरदार जंगी स्वागत करण्यात आले. ढोल ताश्याच्या गजरात व फटाक्याची आतिषबाजी करून हजारोच्या संख्येने लोक एकत्र झाले होते. यावेळी राजपुरी कोळीवाड्यातील असंख्य नाखवा मंडळींनी शेतकरी कामगार पक्षाचा त्याग करून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला तसेच राजपुरी मुस्लिम समाजातील असंख्य बांधव पक्ष प्रवेश केल्याने येथे शेतकरी कामगार पक्ष मोठे खिंडार पडले आहे.पूर्वी हा कोळीवाडा शेतकरी कामगार पक्ष यांच्या सोबत होता. परंतु अलका मोंनाक याना डावलल्यामुळे त्यांचा गट भारतीय जनता पक्षाशी मिळाल्याने येथे भाजपाची ताकद वाढली असल्याचे यावेळी भाजपकडून सांगण्यात आले.

यवतमाळमध्येही शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

वार्ताहर

नागपूर, दि. ९ – राज्य शासनाने अमरावती विभागातील शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ या संस्थेच्या श्रेणीत वाढ केल्यामुळेही संस्था आता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ म्हणून ओळखली जाणार आहे. विशेष म्हणजे आता निवासी महिला तंत्रनिकेतनमध्ये मुलींसह मुलांनाही प्रवेश मिळणार आहे.

अमरावतीत झालेल्या पत्रपरिषदेत तंत्रशिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव यांनी ही माहिती दिली. खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे शुल्क भरमसाठ असल्याने गरीब विद्यार्थी अभियांत्रिकीच्या शिक्षणापासून वंचित राहतात. त्या तुलनेत शासकीय महाविद्यालयाचे शुल्क नाममात्र आहे. यामुळे यवतमाळमधील विद्यार्थ्यांसाठी ही मोठी उपलब्धी ठरली आहे. शैक्षणिक सत्र २०१८-१९ पासून केंद्रीभूत प्रवेशप्रक्रिया सुरू होईल. या संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. या सर्व अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्लीची मान्यता मिळाली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठाशी संलग्न राहील.

जाहीर सूचना

स्वर्गवासी श्रीम. वासंतीबेन मोहन सोलंकी हे, एनएल कॉम्प्लेक्स, आनंद नगर जवळ, न्यू लिंक रोड लगत, दहिसर (पूर्व), मुंबई–४०००६८ येथे कार्यालय असलेले नकूल को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. चे सदस्य आणि सोसायटीच्या 'ए' विंग, मधील फ्लॅट क्र. ४०३ करिता (दोघांचा समावेश) धारक विभिन्न क्रमांक ७१ ते ७५ प्रत्येकी पन्नास रुपयाचे पूर्ण भरलेल्या शेअर्स करिता शेअर प्रमाणपत्र क्र. १५ चे धारक यांचा मृत्यु २४/०६/२०१५ रोजी कोणत्याही नामर्निदशना शिवाय झाला.

सोसायटी, सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेमधील मृत सदस्याचे सदर फ्लॅट आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाकरिता तिच्या वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार /आक्षेपकर्ता किंवा आक्षेपकर्त्यांकडून दावे किंवा आक्षेप सोसायटीच्या मालमत्ता /भांडवलातील मृत सदस्याचे शेअर आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाकरिता तिचे/त्याचे/त्यांच्या दावे/आक्षेपांच्या सबळ इतर पुरावे आणि अशा पुराव्यांच्या दस्तावेजांसह सूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीत मागवत आहे. जर दावे/आक्षेप वेळेत न मिळाल्यास आणि/किंवा उपरोक्त विहित कालावधीनंतर मिळाल्यास सोसायटीच्या उप-विधी अंतर्गत तरतुदीनुसार अशा पध्दतीमध्ये सोसायटीच्या मालमत्ता/ भांडवलातील मृत सदस्याचे फ्लॅट आणि हितसंबंधासह व्यवहार करण्यास सोसायटी मुक्त असेल.

जर कोणतेही दावे/आक्षेप सोसायटीद्वारे मिळाल्यास सोसायटीच्या उप–विधी अंतर्गत तरतुदीच्या पध्दतीमध्ये सोसायटीचे भांडवल/मालमत्तेमधील मृत सदस्याचे शेअर आणि हितसंबंध हस्तांतरणाकरिता सोसायटी व्यवहार करेल.

सोसायटीच्या नोंदणीकृत उप–विधीची एक प्रत दावेदार/आक्षेपकर्त्याच्या निरीक्षणाकरिता सोसायटीच्या कार्यालयात/ सोसायटीचे चेअरमन/सेक्रेटरीसह सकाळी ९.०० ते दु. १२ आणि सायं. ७.३० ते रात्री ९.३० पर्यंत सूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून समाप्तीच्या कालावधीच्या दिनांकापर्यंत उपलब्ध असेल.

करिता आणि च्या वतीने
नकूल को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.

स्थळः मुंबई सही/–
दिनांकः १०/०६/२०१८ मा. सेक्रेटरी

जाहीर नोटीस

सर्वांना कळविण्यात येते की, गाव मोरे, ओस्तवाल नगरीजवळ, नालासोपारा (पू.), ता. वसई, जि. पालघर येथील विशाल नगर चाळमधील शॉप नं. ९, तळ मजला, हे श्री. ओमप्रकाश बनवारीलाल धुरिया ह्यांच्या मालकीचे असून ते आमचे अशील श्री. रामसुरेश छबीराज यादव ह्यांना कायम विकत देण्याचे ठरले आहे. तरी सदर शॉपमध्ये कोणाचेही हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आमच्या ''मथुरा'' बंगला, हनुमान मंदिर हॉलजवळ, यादव पाटील मार्ग, दिवाणमान गाव, वसई रोड (प.), जि. पालघर–४०१ २०२, ह्या पत्त्यावर लेखी, पुराव्यासहित कळवावे, अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजून पुढील व्यवहार केले जातील.

सही/–
श्री. दयानंद कमळाकर मानकर
वकील, मोबा. ९८२२४००३१३

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील शिला अर्पा. को. ऑप. हौ. सो. लि., केबीन रोड, मिरा रोड (पू.) ४०१ १०५ या सोसायटीतील सदनिका क्र. २०२ बाबत सभासदत्व मिळावे म्हणून श्रीमती सिमा संतोषकुमार गुप्ता यांनी संस्थेकडे अर्ज केला आहे.

सदर सदनिका २०२ संस्थेच्या दप्तरी श्री. संतोषकुमार गुप्ता आणि श्रीमती शिवकुमारी गुप्ता यांचे नावे संयुक्तिक होती. श्री. संतोषकुमार गुप्ता यांचे दिनांक २७.०३.२०१८ रोजी निधन झाले आहे त्याचप्रमाणे अर्जदारांनी बंधपत्र सुद्धा दिलेले आहे.

या हस्तांतरण बाबतीत कोणत्याही वारसाच्या, बँकेच्या किंवा इतर वारसाच्या कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध होताच १५ दिवसांच्या आत माझ्या खालील पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे समजून सदर सदनिकेचे सभासदत्व श्रीमती शिवकुमारी गुप्ता आणि श्रीमती सिमा संतोषकुमार गुप्ता यांचे नावे दिले जाईल. त्यानंतर येणारी हरकत ही संस्थेचे पदाधिकारी व सभासद यांचेवर बंधनकारक नसेल.

डी.डी. राईलकर
वकील
श्री श्याम इंटरप्रायझेस करिता
आय ००३ यशवंत विहार फेज १,
विरार (प.)

राज एस्कोटिका इमारतीला तडे



वार्ताहर

भाईंदर दि. ९ – मीरा रोडच्या विनय नगर भागात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पासाठीच्या खोदकामामुळे लगतच्या एका इमारतीच्या खांबाला तडे जाऊन कुंपण भिंतीचा भाग कोसळल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान संतप्त रहिवाशांनी रस्त्यावर उतरत हे काम थांबविले असले, तरी पालिका प्रशासन मात्र मूग गिळून असल्याचा आरोप स्थानिक करीत आहेत.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, मीरा रोड विनय नगर मागील जे.पी. बिल्डरच्या नॉर्थ या प्रस्तावित गृहसंकुलाचे काम सुरू आहे. या इमारतीच्या पोडीयम पार्किंगसाठी खोदकाम करण्यात आले आहे. सुमारे महिनाभर सुरू असलेल्या कामामुळे शेजारील राज एक्सोटिका इमारतीच्या तळमजल्यावरील पिलरला तडे गेले आहेत. तर दुसरीकडे सुमारे २० फूट खोदकाम करण्यात आल्यामुळे इमारतीची संरक्षक भिंत पडली आहे.

ऐन पावसाळ्यात हे खोदकाम सुरू राहिल्यास इमारतीला धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात येताच स्थानिक राहिवशांनी खोदकाम थांबविले. खोदकाम करताना सुरक्षिततेसाठी कोणतीही उपाययोजना न केल्यामुळे सदर दुर्घटना घडली असल्याचा आरोपही स्थानिक करीत आहेत. इमारतीच्या आवारात सकाळ संध्याकाळ लहान मुले खेळतात त्यामुळे इमारतीच्या पदाधिकाऱ्यांनी मागणी केल्यानंतर येथील सुरक्षिततेसाठी पत्रे लावले. मात्र खोदकाम करताना चॅनेलिंग केलेले नाही. असे स्थानिक रहिवासी सागर पवार आदींचे म्हणणे आहे.

माजी नगरसेवक फरीद कुरेशी सह प्रदीप नायर यांनी याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी पालिका आयुक्त बालाजी खतगावकर यांच्याकडे केली आहे. कुठीलीही खबरदारी न घेता व आवश्यक चाचण्या – नियमांचे पालन न करता खोदकाम करण्यास परवानगी कशी दिली असा प्रश्न त्यांनी केलाय. बिल्डरला राजकीय नेत्याचा वरदहस्त असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दुचाकींची समोरासमोर धडक; दोन ठार, चार जखमी

नागपूर, दि. ९ (वार्ताहर) – दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोन जण ठार, तर चार जण जखमी झाल्याची घटना ७ जून रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास गडचिरोली जिल्ह्यातील मुलचेरा–कोपरअल्ली मार्गावर घडली. मृतकांमध्ये १० वर्षांच्या बालकाचा समावेश आहे. हरिशंकर सपन रॉय, विष्णू घरामी रा. देशबंधूग्राम अशी मृतकांची नावे आहेत.

अजय बारिकराव कुमरे, दशरथ अरुण कन्नाके, शिल्पा गोपाल सरकार, चंपा सुकेंदू रॉय अशी जखमींची नावे आहेत. आष्टीकडून येणाऱ्या दुचाकीची मुलचेराकडून कोपरअल्लीकडे जाणाऱ्या दुचाकीस समोरासमोर धडक बसली. यामध्ये १० वर्षीय बालक हरिशंकर रॉय यांचा जागीच मृत्यू झाला. विष्णू घरामी रा. देशबंधूग्राम यांचा मुलचेरा ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अजय कुमरे, दशरथ कन्नाके, शिल्पा सरकार, चंपा रॉय या जखमींना चंद्रपूर येथे हलवण्यात आले.

जाहीर नोटीस

या जाहीर नोटिसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे पेल्हार, ता. वसई, जि. पालघर येथील सर्व्हे नं. २०७, हि. नं. १/४, क्षेत्र ०–४०–० हे. आर + ०–०६–० हे. आर एकूण ०–४६–० हे. आर येणेप्रमाणे शेत जमिनीपैकी फक्त ०–१०–० हे. आर येणेप्रमाणे शेत जमीन माझे अशील **आफताब आलम शकील अहमद शेख** यांच्याकडून विकत घेण्यास वाटाघाटी करीत असून सदरील व्यवहारास कुणाही इसमाची अथवा संस्थेची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा कुणाही इसमाचा हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा, वारसा हक्क, गहाण, तारण इत्यादी असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत सर्व कागदोपत्री लेखी पुराव्यानिशी, आमच्या श्रीराम कॉम्प्लेक्स, पहिला माळा, नवघर, वसई रोड (प), जि. पालघर, (फोनः– २३३५१४०) या पत्त्यावर कळवावे, तसे न केल्यास वरीलप्रमाणे मिळकतीत कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध नाही व असल्यास तो सोडून देण्यात आलेला आहे, असे समजून विक्रीचा व्यवहार पूर्ण केला जाईल.

सही/–
(श्री. आर. डी. केवट)
घेणाऱ्यांचे वकील

ठिकाणः वसई
दिनांकः ०९/०६/२०१८

जाहीर सूचना

श्रीकुमार गोपालकृष्णन नायर (दावेदार) हे श्रीम. जालजादेवी गोपालकृष्णन नायर, ज्या आता मयत झाल्या आहेत यांच्यासह दोन विभिन्न संपूर्ण स्टॅम्प्ड व नोंदणीकृत विक्री करार यांच्या अंतर्गत सर्व्हे क्र. १६३/२, गाव नेरळ, कर्जत ४१० १०१ महाराष्ट्र येथील दत्ताशिष बिल्डींगमधील ब्लॉक २ मधील घर क्र. २९३४/२२ व घर क्र. २९३४/२३ दोन्ही मोजमापित ५८५ चौ. फूट धारक मालमत्तेचे (दोन्ही सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) विशेष मालक असल्याचा दावा करत आहेत.

कोणाही व्यक्तीचा वरील निर्देशित मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणतेही दावे असल्यास तसेच विक्री, भेट, भाडेपट्टा, वारसा, अदलाबदल, गहाण, प्रभार, धारणाधिकार, न्यास, ताबा, सुविधाधिकार, जप्ती वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणत्याही प्रकारचे हितसंबंध असल्याचा दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरीतांना त्यांच्या कार्यालयाच्या पत्त्यावर सदर सूचनेपासून ७ **दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा कोणत्याही संदर्भाविना माझे अशील यांच्या नावे गहाण ठेवण्यात येईल व सदर दावा व दावे, काही असल्यास ते अधित्यागित समजले जातील.

सही/–
वकील
किरण शर्मा/
लीगल सारथी
४१८, श्रीकांत चेंबर्स, ए विंग,
व्ही.एन. पुरव मार्ग (आर. के. स्टुडिओच्या पुढे),
चेंबूर, मुंबई – ४०० ०७१.
दि. १०.०६.२०१८

नितिन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज लिमिटेड

(सीआयएन – एल२९१९३एमएच१९९५पीएलसी०९२३२३)

नोंद. कार्यालय : ५०१, डेल्टा, टेक्नोलॉजी स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई–४०० ०७६. दूर.क्र. ०२२ ४०४५७०००
फॅक्स क्र. ०२२ २५७० ११९०, ईमेल : nitinfire@vsnl.com,
संकेतस्थळ : http//www.nitinfire.com

सूचना –मंडळाची सभा

सेबी (लिसिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन २०१५च्या रेग्युलेशन ४७ च्या सहवाचता २९ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त लेखापरिक्षित वित्तीय स्टेटमेंट आणि ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी एकत्रित आणि अलिप्त लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना, इतर बाबींसह विचारात आणि मंजूर करण्यासाठी गुरूवार, दिनांक १४ जून, २०१८ रोजी घेण्यात येणार आहे. सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ म्हणजेच www.nitinfine.com आणि स्टॉक एक्स्चेंजचे संकेतस्थळ म्हणजेच www.bseindia.com आणि www.nseindia.com यावर उपलब्ध असणार आहे.

नितीन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/–
ठिकाण : मुंबई **श्रबन कुमार करण**
दिनांक : ९ जून, २०१८ **कंपनी सचिव**

मत्स्यव्यवसाय वाढीसाठी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प

वार्ताहर

नागपूर, दि. ९ – राज्य शासन दर महिन्याला ४५० कोटी रुपयांचे दूध, अंडी आणि मासोळी अन्य राज्यातून आयात करीत असते. मात्र ही आयात बंद करून राज्याच्या तिजोरीला आणि स्वयंपूर्णतेला विदर्भातील मत्स्य व्यवसायिक व शेतकरी मदत करू शकतात. यामुळेच गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यामध्ये गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायाला गती देण्यासाठी अनेक प्रयोग आगामी वर्षभरात केले जाणार असून चंद्रपूर आणि गडचिरोलीत या व्यवसायाला गती देण्यासाठी लवकरच पथदर्शी प्रकल्प उभारला जाणार असल्याची घोषणा राज्याचे वित्त, नियोजन व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार व पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री महादेव जानकर यांनी चंद्रपूर येथे केली.

चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात गुरुवारी गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील मत्स्यव्यावसायिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उभयतांनी ही घोषणा केली.

पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये तलाव व जलसाठे मोठ्या प्रमाणात आहेत. या भागामध्ये गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायाला चालना मिळू शकते. या पद्धतीच्या व्यवसायाची पाळेमुळे या ठिकाणी रुजलेली आहे. त्याला आधुनिक स्वरूप देऊन आवश्यक मदत देऊन, प्रशिक्षण व संशोधन उपलब्ध करून आणखी गती देण्याचा राज्य शासनाचा मानस असून त्यासाठी या दोन जिल्ह्यांमध्ये या व्यवसायाला मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या बैठकीला राज्याचे मत्स्यव्यवसाय आयुक्त अरुण विधळे, महाराष्ट्र पशुसंवर्धन व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू आशितोष पातुरकर, चंद्रपूर जिल्हा मत्स्यव्यवसाय विभागाचे साहाय्यक आयुक्त सुनील जांभुळे, चंद्रपूर बांधकाम विभागाचे अभियंता जुनारकर यांनी विदर्भातील मत्स्यव्यवसाय, मत्स्यव्यवसाय संशोधनाची विदर्भातील गरज, चंद्रपूर जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायिकांची सद्यस्थिती व फिश मार्केट उभारण्याची आवश्यकता आदींबाबत सादरीकरण केले.

आघाडीसाठी काँग्रेस व राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष सकारात्मक

वार्ताहर

> आगामी निवडणुकीत धर्मनिरपेक्ष विचारांचे पक्ष एकत्र यावेत, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारिप–बहुजन महासंघाचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आमच्या सोबत यावे, अशी आमची व राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका आहे.
> *– **आमदार विजय वडेट्टीवार काँग्रेसचे विधिमंडळाचे उपगट नेते***

नागपूर, दि. ९ – 'वर्षभरात होऊ घातलेल्या लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीसंदर्भात वरिष्ठ पातळीवर बोलणी झाली आहे. आघाडीसाठी दोन्ही पक्ष सकारात्मक असून त्यावर जवळ–जवळ शिक्कामोर्तब झाले आहे,' अशी माहिती काँग्रेसचे विधिमंडळाचे उपगट नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी दिली. तसेच केवळ जागावाटप तेवढे बाकी असल्याचे सांगत इतरही समविचारी पक्ष आघाडीसोबत येतील', असा विश्वासही विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूर येथे आयोजित पत्रपरिषदेत व्यक्त केला आहे.

आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, आगामी निवडणुकीत धर्मनिरपेक्ष विचारांचे पक्ष एकत्र यावेत यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारिप–बहुजन महासंघाचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आमच्या सोबत यावे, अशी आमची व राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका आहे, असे सांगत आघाडीसोबत शिवसेना येण्याची शक्यता त्यांनी फेटाळून लावली. अलीकडेच झालेल्या महाराष्ट्र विधान परिषदेच्या वर्धा–चंद्रपूर–गडचिरोली या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेससह शिवसेना, बसपा, शेतकरी संघटना यांची साथ मोलाची ठरल्याने काँग्रेस उमेदवाराने अटीतटीची लढत दिल्याचे त्यांनी सांगितले. वाढती बेरोजगारी, पेट्रोल–डिझेलचे वाढते दर, वाढती महागाई, यासह उद्योगधंदे बंद होत असताना कुठे अच्छे दिन आहेत, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. यासाठी स्थानिक गांधी चौकात चर्चेसाठी आम्हाला बोलवा व स्वतःही सहभागी व्हा व जनतेलाच त्याबाबत ठरवू द्या, असे खुले आव्हान केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांना देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील शिला अर्पा. को. ऑप. हौ. सो. लि., केबीन रोड, मिरा रोड (पू.) ४०१ १०५ या सोसायटीतील सदनिका क्र. २०८ बाबत सभासदत्व मिळावे म्हणून श्रीमती रजाईबाई शिवाजी रावनंग यांनी संस्थेकडे अर्ज केला आहे.

सदर सदनिका २०८ संस्थेच्या दप्तरी श्री. शिवाजी माणका रावनंग यांचे नावे होती. यांचे दिनांक २०.०९.२००३ रोजी निधन झाले आहे त्याचप्रमाणे त्यांनी बंधपत्र सुद्धा दिलेले आहे.

या हस्तांतरण बाबतीत कोणत्याही वारसाच्या, बँकेच्या किंवा इतर वारसाच्या कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध होताच १५ दिवसांच्या आत माझ्या खालील पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा कोणाचीही हरकत नाही असा समजून सदर सदनिकेचे सभासदत्व श्रीमती रजाईबाई शिवाजी रावनंग यांचे नावे दिले जाईल. त्यानंतर येणारी हरकत ही संस्थेचे पदाधिकारी व सभासद यांचेवर बंधनकारक नसेल.

डी.डी. राईलकर
वकील
श्री श्याम इंटरप्रायझेस करिता
आय ००३ यशवंत विहार फेज १,
विरार (प.)

जाहिर नोटीस

तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांचे न्यायालयात अर्जदार **श्री.मनोहर पांडुरंग पाटील व इतर १९, रा. चिखलडोंगरे, ता.वसई, जि,पालघर** यांनी गांव **मौजे चिखलडोंगरे, ता.वसई येथिल स.नं. ९९/२२, क्षेत्र ०.०२.०,आकार ०.११, स.नं. १११/२६, क्षेत्र ०.०३.३० आकार ०.२०, स.नं. ११३/१८, क्षेत्र ०.०२.५०, आकार ०.२३, स.नं २६४/२७, क्षेत्र ०.०४.३०, आकार ०.४१** या जमिनीचे **मालक श्री.अंबालाल मनीलाल जोशी व इतर रा. आगाशी, ता.वसई, जि.पालघर** यांचे नावे दाव्यातील ७/१२ उताऱ्यात कब्जेदार सदरात आहेत.सदर जमिनीची अर्जदार यांनी कुळ कायदा अन्वये **दावा क्रमांक ३२ग २/२०१८ दिनांक ९/०१/२०१८** रोजी दाखल केलेला आहे. सदरची जमीन **श्री.मनोहर पांडुरंग पाटील व इतर १९,रा. चिखलडोंगरे, ता.वसई, जि.पालघर** यांचे कब्जेवहिवाटीत आहे. जमिनीचे मालक **श्री श्री.अंबालाल मनीलाल जोशी व इतर १ रा. आगाशी, जि.पालघर** हे हद्दीत राहत नसुन त्यांना नोटीस बजावणेत आले नाही.सदर नोटीसबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी **दिनांक १९/६/२०१८** रोजी सुनावणीच्या अंतीम तारखोस हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.याची नोंद घ्यावी.

सही xxx
तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण वसई

जाहीर सूचना

सर्व तमाम जनतेस या सूचनेदवारे असे कळविण्यांत येते की, प्रस्तावि 'स्पेशल टाउन शिप प्रोजेक्ट' हा मौजे सारंग, ता. खालापूर, जिल्हा—रायगड येथील सर्व्हे नंबर २/३,३/०, ४/१, ४/२,४/३, ४/४,५/१, ५/२, ५/३,६/१, ६/२, ६/३, ६/४, ६/५, ६/९, ६/१०, ६/१५, ६/१९,६/२०, ६/२२, ६/२३, ७/० पैकी, ८/४, १०/ १ब, १०/१क, १०/१ड, ११/३, १२/०, १३/१,१३/२, १४/०, १५/०, १६/१अ, १६/१ब, १७/० पैकी, १८/०, १९/० पैकी, २१/०, २२/०, ४७/०, ५३/२अ, ५३/२बपैकी,५३/४, ५३/५अ, ५३/५ब, ५३/६, ५३/७, ५३/८, ५४/१, ५४/२, ५५/१अ, ५५/२अ, ५५/२ब, ५९/०, ६१/०, ६३/०, ६४/२, ६५/०, ६६/० पैकी, ६७/०, ६८/० पैकी, ६९/० पैकी, ७०/० पैकी, ७१/१अ पैकी, ७१/२, ७१/३ पैकी, ७१/४, ७२/१, ७२/२ब, ७२/३, ७२/४, ७२/५, ७२/६अ, ७२/६ब पैकी, ७२/६क, ७२/७, ७२/८, ७२/९, ७२/१०, ७३/१, ७३/२, ७३/३, ७३/४, ७३/५, ७३/६, ७३/७, ७३/९, ७४/२, ७४/३, ७५/०, ७६/२, ७६/३, ७६/७, ७६/८, ७६/९, ७६/१०, ७६/११, ७८/०, ७९/०, ८०/०, ८१/०, ८२/०, ८३/१, ८३/२अ, ८३/२ब, ८३/२क, ८३/३, ८३/४, ८४/०, ८६/० हया जमिन मिळकतींसाठी विकासक मे. क्लॅरिजेस एस.ई.झेड. डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, रजि. ऑफिसचा पत्ता:१०४, मित्तल चेंबर्स, १० वा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई — ४०० ०२१ यांना पर्यावरण आणि वन मंत्रालय, नवी दिल्ली यांसकडून मंजुरी पत्र कमांक एफ नंबर २१—२८५/२०१७—१अ—३,दि.३१/०५/२०१८ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. सदर मंजुरी पत्राची प्रत महाराष्ट पर्यावरण व वनमंत्रालयाच्या http://ec.maharashtra.gov.inया वेब साईटवर देखील उपलब्ध आहे.

सही/—
क्लॅरिजेस एस.ई.झेड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड
१०४, मित्तल चेंबर्स, १० वा मजला, १० वा मजला नरिमन पॉईंट, मुंबई — ४०० ०२१.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
Central Bank of India

गोरेगाव शाखा
निराला हाऊस, पं. दिनदयाल उपाध्याय चौक,
३६, जवाहर नगर, गोरेगाव (प.), मुंबई–४००१०१.

मागणी सूचना

(सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अनुसार)

सेंट्रल बँक ऑफ इंडियाने खालील कर्जदारांना **सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या** नावे समतुल्य/कायदेशीर गहाण निर्माण करून कॅश क्रेडिट/ओव्हरड्राफ्ट आणि निवासी/ वाणिज्यिक परिसर/वाहन खरेदी करण्यासाठी कर्ज मंजूर केले होते. कर्जाचा परतावा अनियमित बनला आणि खाते अंतिमत: रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे निर्देश आणि मार्गदर्शक तत्त्वानुसार **०२/०५/२०१८** रोजी नॉन परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाने त्यामुळे सरफैसी ॲक्ट २००२ च्या कलम १३ (२) अन्वये तिचे हक्क वापरले आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ३ अनुसार मागणी सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसात त्याच्या/तिच्या नावासमोर नमूद केलेली संपूर्ण थकबाकी परतफेडीसाठी कर्जदारांना (प्रोप्रायटर) बोलावणे केले आहे. कर्जदारांनी (प्रोप्रायटर) सूचना प्राप्त झाल्याची पोच दिलेली नाही.

खालील कर्जदारांना (प्रोप्रायटर) आजपासून ६० दिवसांत त्याच्या/तिच्या नावासमोर नमूद केलेली संपूर्ण थकबाकी अधिक तारखेपर्यंत उपार्जित प्रभार आणि व्याज अदा करण्यासाठी जाहीरपणे पुन्हा एकदा याद्वारे बोलाविण्यात येत आहे. कसूरवार ठरल्यास **सेंट्रल बँक ऑफ इंडिया** तारण मत्तेचा कब्जा घेण्यासाठी सर्व किंवा कोणत्याही कायदेशीर हक्काचा वापर करेल आणि ती निकाली काढेल आणि थकीत रकमेकरिता प्रक्रिया समायोजित करेल.

कर्जदार (प्रोप्रायटर) आणि सर्वसामान्य जनता यांना तारण मत्तेच्या मालकीवर अन्य संक्रमण किंवा कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचा हितसंबंध निर्माण करण्यापासून प्रतिबंध सुध्दा करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव आणि खाते क्र.	तारण मत्तेचे वर्णन	थकबाकी देय	मागणी सूचनेची तारीख
१)	**मे. शुभम कॅटरर्स श्री. निराकर जी. साहू (प्रोप्रा.): बी/२१३, अशोका सुपर मार्केट, बाटा शोरुम वर, एस. व्ही. रोड, गोरेगांव पश्चिम, मुंबई ४००१०४.**	२०१, न्यू अंबिका दर्शन सीएचएसएल, जे-विंग, पूजा गार्डन, न्यू गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व, ठाणे- ४०११०७	मुदत कर्ज खाते नं. ३०८७०८०९०५ ९/०५/२०१८ रोजीस रु. १६,८८,४९५/-	०९/०५/२०१८

सही/–
ठिकाण : गोरेगाव (प.) **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : ०९०६/२०१८ **सेंट्रल बँक ऑफ इंडिया**

शिर्डीतील हार प्रसाद दुकानांना दरफलक लावणार



वार्ताहर

शिर्डी, दि. ९ – हारप्रसादाच्या ताटाची अव्वाच्या सव्वा रक्कम लावून साईभक्तांची होणारी लूट थांबविण्यासाठी आता नगरपंचायत प्रशासन व पदाधिकारी सरसरावले असून शिर्डीत सर्व दुकांनाना हारप्रदासाचे दर लावण्याची सक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरात येणाऱ्या भक्तांना याची माहीती व्हावी यासाठी संपूर्ण शहरात व मुख्य रस्त्यावर माहीती फलक लावण्यात येणार आहे. माजी न्यायमुर्तींना लुटल्यानंतर नगरपंचायत प्रशासनस पदाधिकाऱ्यांनी आता दखल घेतली असून या निर्णयाची साईबाबा संस्थान, नगरपंचायत, शिर्डी पोलीस स्टेशन संयुक्तरित्या अंमलबजावणी करणार असल्याचे सांगण्यात आले.

गुरुवार, ७ जून रोजी लखनौ उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती एन.के. मल्होत्रा साईदर्शनासाठी आले होते. साईमंदिराच्या प्रवेशद्वार क्रमांक तीन जवळ त्यांनी आपले वाहन उभे केले असता त्यांना एका एजंटाने गाठले. आज गुरुवार आहे. साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सुरू आहे, अशा विविध गोष्टी सांगुन पुजेचे ताट घेण्यास भाग पाडले. प्रवेशद्वार क्रमांक तीन जवळील एका दुकानात नेऊन त्यांच्याकडुन फुलप्रसाद ताटाचेस सहा हजार रुपये घेतले. चक्क न्यायमुर्तींना गंडा घालण्यात आल्याची बाब उघडकीस आल्याने याची युवानेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी दखल घेत उपनगराध्यक्ष सुजित गोंदकर यांच्याशी चर्चा करुन शिर्डीत फुलहारप्रसाद दुकांनाना भावफलकाचे दर निश्चित करावी याबाबतची सूचना केली. त्यानुसार उपनगराध्यक्ष सुजीत गोंदकर, माजी उपनगराध्यक्ष जगन्नाथ गोंदकर, युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन कोते, नगरसेवक हाजी बिलाल शेख व मुख्याधिकारी सतिष दिघे यांनी नगराध्यक्षा योगिता अभय शेळके यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून साईभक्तांची भविष्यात अशा प्रकारे लूट होणार नाही यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्याचा निर्णय घेतला. नगरपंचायत प्रशासन व व्यवस्थापनाने हारफुलांचे दरपत्रक निश्चित करुन त्याचे फलक संपूर्ण शहरात तसेच मुख्य रस्त्यावर लावण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी शिर्डी नगरपंचायत, साईसंस्थान प्रशासन व शिर्डी पोलीस स्टेशनची मदत घेण्यात येणार आहे.

शिर्डीत येणाऱ्या भाविकांकडून पुजेच्या ताटाचे अव्वाच्या सव्वा रक्कम घेऊन लूट केली जात असल्याने शिर्डी या धार्मिक स्थळाची बदनामी होत आहे.यापुढे अशा घटना घडणार नाही यासाठी विशेष उपाय योजना राबविण्यात येणार आहे. संपूर्ण शहरात दरफलक लावण्यात येणार असून, शहरात भाविकांचे आगमन होण्यापूर्वीच त्यांना या फलकाची माहीती होईल. शहराची प्रतिमा जपण्यासाठी काळजी घेण्याच्या सूचना युवानेते डॉ. सुजय विखे यांनी दिल्या आहेत.

आवास फायनान्शियर्स लिमिटेड

(याआधी एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) (सीआयएनः युं६५९२२आरजे२०११पीएलसी०३४२९७)

नोंद. आणि निगम कार्यालय: २०१–२०२, २ रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रिअल एरिया, जयपूर ३०२ ०२०.

सिक्युरिटायझेशन ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

कर्ज खाते एनपीए झाल्यामुळे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (प्राअ) सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत ६० दिवसांची मागणी सूचना तक्त्यात देण्यात आलेल्या कर्जदारांना निर्गमित केली आहे. सूचनेप्रमाणे कर्जदारांनी ६० दिवसांत रकमेचा भरणा न केल्यास, खाली दिल्याप्रमाणे तारणाच्या लिलावाने रकमेची वसुली करण्यात येईल. पाठविलेली मागणी सूचना कर्जदार/हमीदारांना प्राप्त न झाल्याने, मागणी सूचनेची प्रत खालील नमूद तारण मत्तेला चिटकवण्यात आली आहे. तरी, तुम्हा कर्जदारांना कर्ज रकमेसह पुढील व्याज आणि वसुली खर्चाचा भरणा ६० दिवसांत करण्यास सांगण्यात येत आहे, अन्यथा सदर ॲक्टच्या कलम १३(४) आणि १४ अंतर्गत एओ खालील नमूद तारणाचा कब्जा घेण्यास मुक्त असतील.

कर्जदाराचे नाव	कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना तारीख आणि रक्कम	गहाण मिळकतीचे वर्णन
श्रीम. रुपाली मारुती कोंदाळकर श्री. मारुती पांडू कोंदाळकर (खाते क्र.)एलएनव्हीआयआर०२२१७–१८००५१०७६	०७ जून, १८ रु. १९,५५,३६७/– दि. ०६ जून, २०१८	तळ मजला, फ्लॅट क्र. १, धनलक्ष्मी सोसायटी, सर्व्हे क्र. १७७, हिस्सा क्र. २, सर्व्हे क्र.१८७, हिस्सा क्र. ४, सर्व्हे क्र. १८८, हिस्सा क्र. ४, मनवेल पाडा रोड, विरार (पू.), मुंबई, महाराष्ट्र **मोजमापित ४७.३९ चौ. मीटर**
श्री. सागर चंद्रशेखर कुलकर्णी श्रीम. वृशाली सागर कुलकर्णी (खाते क्र.) एलएनपीआयएम००३१२–१३०००३३४० एलएनपीआयएम०१८१५–१६००१७९३८	०७ जून, १८ रु. ९,५६,२२२/– आणि रु. ११,३५,०४५/– दि. ०६ जून, २०१८	सर्व्हे क्र. ८, हिस्सा क्र. ४, फ्लॅट क्र. ५०४, ५वा मजला, ओमकार हाईट्स, आंबेगाव बीके, जि. पुणे, महाराष्ट्र **मोजमापित ६५० चौ. फूट.**
श्री. शामराव एकनाथ शेळके श्रीम. उर्मीला शामराव शेळके हमीदारः श्री. लक्ष्मण कुडंलीकराव थोरात (खाते क्र.) एलएनपीआयएम००४१२–१३०००१०२१	०७ जून, १८ रु. १०,५१,८७६/– दि. ०६ जून, २०१८	सर्व्हे क्र. ३८, हिस्सा क्र. २/१/१, फ्लॅट क्र. ३, दुसरा मजला, समर्थ एनक्लेव पिंपरी चिंचपड कॉर्पोरेशन, गाव खरडी, तहसील–हवेली, १८, जिल्हा पुणे, महाराष्ट्र, **मोजमापित ५५० चौ. फू. सह टेरेस क्षेत्र ५७० चौ. फू.**
श्रीम. योगिता विकास पोळ, श्री. विकास परमेश्वर पोळ हमीदारः श्री. उत्तम राम सरवदे (खाते क्र.) एलएनटीएचए०१२१४–१५०० १३५१८	०७ जून, १८ रु. ९,२०,४९९/– दि. ०६ जून, २०१८	सर्व्हे क्र. ९३/८, फ्लॅट क्र. ४०१, ४था मजला, ए–विंग, स्पिरिट लाईफस्टाईल, कल्याण शहर, गाव–वडवली अजंता पेपर मिल पुढे, शहाड (प.), ता. कल्याण, ठाणे, महाराष्ट्र. **मोजमापित ४११.०० चौ. फू.**

दिनांक :१०.०६.२०१८ **प्राधिकृत अधिकारी, आवास फायनान्शियर्स लिमिटेड**